# MMU अंतर्गत कंत्राटी पदभरती जाहीरात

## Walk in Interview, Date:-10/01/2020 Time 10.00 am

स्थळः- तळमजला राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद सातारा

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा आरोग्य सोसायटी, सातारा, महाराष्ट्र

जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

| अ. क्र | पदाचे नाव (कार्यक्रम) | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Medical Officer (महिला अधिकारी) | 1 | **महाबळेश्वर (वाघावळे, बामणोली)** | खुला 38, NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल | MBBS/ BAMS/BUMS | Open:-1 | रु.४००००/-प्रति माह MBBS रु.३००००/- BAMS/BUMS |

**अटी व शर्तीः-**

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती **दि. 7/01/2020 ते दि. 6/12/2020** पर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) **जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सातारा यांनी राखून ठेवले आहेत.**

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

७) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

८) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

९) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१०) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

११) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील.

१२) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन **गुणानुक्रमे** यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

१३) शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१४) **अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याचे मागणी करता येणार नाही.**

१५) उपरोक्त पदापैकी तांत्रिक पदांकरीता, स्टाफ नर्स, औषध निर्माता, वैद्यकिय अधिकारी ई. पदांकरीता तत्सम **कौन्सिलचे रजिस्ट्रेशन** प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१६) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१७) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज **प्रत्येक्ष मुलाखत दिवशी सर्व शैक्षणिक छायांकित कागदपत्र जोडुन सादर करावेत.** जन्मतारखेचा पुरावा ओळखपत्र, तसेच सर्व शैक्षणिक कागदपत्रे मुळ स्वरुपात सादर करावेत.

१८) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१९) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

२०) मुलाखतीचे निकाल व तपशिल वेळोवेळी सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर **www.zpsatara.gov.in** तसेच सातारा जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही. त्याकरीता उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान सातारा कार्यालयाकडील ०२१६२-२३५९४८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधु शकतात.

❖ **खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.**
२) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ६) शासकीय अनुभव असलेस अनुभव दाखला

| सही | सही | सही |
|---|---|---|
| सदस्य सचिव | सदस्य | अध्यक्ष निवड समिती |
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| एनएचएम. जि.प. सातारा | जिल्हा परिषद सातारा | जिल्हा परिषद सातारा |